लोकमत

# चार धाम यात्रेला चला; प्रवासासह सारं काही मोफत

## प्रत्येक लाभार्थी व्यक्तीवर सरकार ३० हजार रुपये खर्च करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** राज्य सरकारने 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन' योजना जाहीर केली आहे. योजनेंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना शासकीय खर्चाने तीर्थक्षेत्रांची यात्रा करून दिली जाणार आहे. याअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना यात्रेवर पाठवणे, भोजन, निवास आदी सर्व खर्च सरकार करणार आहे. या योजनेंतर्गत सरकार प्रत्येक लाभार्थी व्यक्तीवर ३० हजार रुपये खर्च करणार आहे.

चार धाम यात्रा, माता वैष्णोदेवी यात्रा, अमरनाथ यात्रा आणि इतर धर्मीयांचीही देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत. जिथे बहुतेक ज्येष्ठ नागरिक त्यांच्या आयुष्यात एकदा तरी भेट देण्याचे स्वप्न पाहतात. पवित्र कार्य म्हणून तीर्थयात्रेला जाण्याची वडिलांची सुप्त इच्छा असते. परंतु सामान्य कुटुंबातील गरीब ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे किंवा सोबत कोणी नसल्यामुळे ते यात्रेला जाण्याचे स्वप्न पूर्ण करू शकत नाहीत.

या सर्व अडचणी लक्षात घेऊन राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्येष्ठ नागरिकांसाठी देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांचा प्रवास सुकर व्हावा आणि सर्व ज्येष्ठ नागरिकांना मानसिक शांती व आध्यात्मिक स्तर गाठण्यासाठी तीर्थयात्रेची सुविधा उपलब्ध करून द्यावी. त्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन' योजना सुरू करण्यात आली आहे.




### ६० साठी पूर्ण केलेल्यांसाठी योजना

राज्यातील गरीब आणि आर्थिक दुर्बल कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत तीर्थयात्रा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. या योजनेद्वारे, राज्यातील ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या नागरिकांना राज्यातील आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत प्रवासाची सुविधा दिली जाईल.




### ३१ ऑगस्टपर्यंत करता येणार अर्ज

या योजनेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत करता येणार अर्ज करता येणार आहे.

### उत्पन्न २.५ लाखांपेक्षा जास्त नको

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. तसेच ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, केंद्र सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत, असे सदस्य पात्र ठरणार नाहीत.

### अर्ज करण्याची प्रक्रिया

पात्र ज्येष्ठ नागरिकांना या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज सुविधा उपलब्ध होणार आहे. ज्यांना ऑनलाइन अर्ज सादर करता येत नसेल, त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा सेतू केंद्रात उपलब्ध असेल. सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रासमोर, श्रद्धानंदपेठ, नागपूर येथेही अर्ज करता येईल. अर्जदाराने स्वतः उपरोक्त ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक असेल. जेणेकरुन त्यांचा थेट फोटो काढता येईल आणि केवायसी करता येईल. यासाठी अर्जदाराने कुटुंबाचे पूर्ण ओळखपत्र (रेशन कार्ड), स्वतःचे आधार कार्ड आणणे आवश्यक आहे. यासोबतच ओळखपत्र, जन्माचा दाखला, फोटो, मोबाइल क्रमांक, उत्पन्नाचा दाखला आदी कागदपत्र लागतील. अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पात्र अर्जदारांची तात्पुरती यादी पोर्टल, ॲपवर जाहीर केली जाईल. पात्र अंतिम यादीतील अर्जदार दुर्दैवाने मयत झाल्यास सदर अर्जदाराचे नाव लाभार्थी यादीतून वगळण्यात येईल.

### ७५ वर्षांवरील नागरिकाला सोबत एकाला नेता येणार

७५ वर्षांवरील अर्जदाराला त्याच्या पती, पत्नीला किंवा सहायक यापैकी एकाला त्याच्यासोबत नेण्याची परवानगी असेल. अर्जदाराने त्याच्या अर्जात तसे नमूद करणे आवश्यक आहे. ७५ वर्षांवरील अर्जदाराच्या जोडीदाराचे वय ६० वर्षांपेक्षा कमी असले तरीही प्रवासी सहायक अर्जदारासोबत प्रवास करू शकेल.

### निर्धारित तीर्थस्थळे; एकदाच मुभा

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत महाराष्ट्र शासनामार्फत देशातील १३९ धार्मिक स्थळांचे दर्शन करण्यात येणार आहे. त्यापैकी देशभरातील ७३ आणि महाराष्ट्र राज्यातील ६६ धार्मिकस्थळे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.